# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.१६/०५/२०२४

**प्रेसनोट**

मा.निवडणूक निरीक्षक श्री.अजयसिंग तोमर (भा.प्र.से.) यांनी आज दि.१६ मे २०२४ रोजी लोकसभा निवडणुकीच्या तयारीच्या अनुषंगाने वसई विरार शहरास भेट देऊन निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. महानगरपालिकेच्या वतीने मा.आयुक्त श्री.अनिलकुमार पवार (भा.प्र.से.) यांनी मा.निवडणूक निरीक्षक महोदयांचे स्वागत केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त श्री.रमेश मनाळे, अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे तसेच सहा.निवडणूक निर्णय अधिकारी श्री.शेखर घाडगे, पोलीस उप-आयुक्त श्री.जयंत बजबळे, मनपा उप-आयुक्त श्री.नानासाहेब कामठे व इतर अधिकारी उपस्थित होते.

मा.निवडणूक निरीक्षक यांनी सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण करणाऱ्या व विनापरवाना लावण्यात आलेल्या निवडणूक संदर्भातील जाहिराती यांची पाहणी करून त्यांचेवर वेळीस कारवाई होईल याची दक्षता घेण्याची सूचना दिली. यासंदर्भात महानगरपालिका प्रशासनाकडून प्रभाग कार्यालयांना सूचना देण्यात येऊन अशा जाहिराती संदर्भात कारवाई करण्यात येत असल्याचे मा.निवडणूक निरीक्षक यांना अवगत करण्यात आले. मा.निवडणूक निरीक्षक यांनी काही महत्वाच्या मतदान केंद्रांना भेट देऊन तेथील नियोजनाची पाहणी केली तसेच एस.एस.टी. नाक्यांनाही भेट दिली.

महानगरपालिकेमार्फत वसई विरार क्षेत्रातील ९११ मतदान केंद्रांवर किमान आवश्यक सुविधा (Minimum Assured Facility) देण्यात येत आहे. त्यामध्ये पिण्याचे पाणी, लाईट-पंखे व्यवस्था, मंडप व्यवस्था, दिव्यांगांसाठी रॅम्प व्यवस्था इ.बाबींची पूर्तता महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सर्व मतदान केंद्रांवर प्राथमिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करण्यात आली असून प्रत्येक मतदान केंद्रावर १ आशा वर्कर व १ ANM तसेच ५ मतदान केंद्रामागे १ डॉक्टर याप्रमाणे नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर मेडिकल कीट देण्यात येणार असून ३० रुग्णवाहिका ची व्यवस्था करण्यात आली आहे. मतदान केंद्रावर दिव्यांगांसाठी व्हीलचेयर सुविधा पुरविण्यात येत आहे. महानगरपालिकेमार्फत एकूण ३६७ व्हीलचेयर उपलब्ध करण्यात आले आहेत. तसेच मतदान जनजागृती करून मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी महानगरपालिकेमार्फत विविध जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

अशा पद्धतीने महानगरपालिका निवडणुकीसाठी तत्पर असल्याचे मा.निवडणूक निरीक्षक यांना अवगत करण्यात आले.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**